| | |
|---|---|
| | **रेग्युलर कज्जा क्रमांक १०७/२०२१.**<br>श्री.अमीत नामदेव पाटील,<br>विरुध्द<br>ग्रामपंचायत कोडोली तर्फे ग्रामसेवक वगैरे. |

**निशाणी १३ खालील आदेश.**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक होवून दावा कलम १ मधील मिळकतीची (यापुढे त्याचा उल्लेख “दावा मिळकत”असा करणेत येत आहे) सद्याची परिस्थिती न्यायालयीन पटलावर आणणेसाठी दाखल केलेला आहे.

२. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द कायम मनाई दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादींनी सदरचा अर्ज न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणुकीकरिता आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत अर्जामध्ये वादीने प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये गावातील गोळा झालेला कचरा, घाण टाकत आहेत. प्रतिवादी यांनी सदर दावा मिळकतीमध्ये गावातील कचरा, घाण टाकत असलेबाबतची वादीची कथने दाव्यामध्ये नाकारलेली नाहीत तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे क्षेत्रामध्ये मंदिर, रस्ता व शौचालय याबाबी असलेचे नमुद केले आहे. त्यामुळे वादी नमुद करीत असलेली दावा मिळकती बाबतची प्रत्यक्ष वस्तुस्थिती व प्रतिवादी नमुद करीत असले दावा मिळकतीचे क्षेत्रामध्ये मंदिर, रस्ता व शौचालय या बाबी असलेचे नमुद केलेले नाही.

४. त्यामुळे वादी नमुद करीत असलेली दावा मिळकतीबाबतची प्रत्यक्ष वस्तुस्थिती व प्रतिवादी नमुद करीत असले दावा मिळकतीबाबतची सत्य वस्तुस्थिती काय आहे, प्रतिवादी यांनी सदर दावा मिळकतीमध्ये कचरा टाकण्याचे व घाण टाकण्याचे ठिकाण केले आहे किंवा नाही तसेच वादी प्रतिवादी यांचेविरुध्द ज्या क्षेत्राबाबत मनाई मागणी करीत आहेत ते क्षेत्र सध्या काय परिस्थितीमध्ये आहे या सर्व बाबी प्रत्यक्ष संपुर्ण वस्तुस्थितीचा अहवाल मे. न्यायालयाचे पटलावर येण्याकरिता कोर्ट कमिशनर यांचे मार्फत दावा मिळकतीची पाहणी करुन त्या संदर्भात अहवाल

सादर करणेत यावा यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे वादी, प्रतिवादी यांच्या मध्ये असणा-या वादाचे कायमस्वरुपी गुणदोषावर निराकरण करणे सोयीचे होईल. सदरचा अर्ज मंजूर केलेने प्रतिवादीस कोणतेही नुकसान होणार नाही, सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. वादी यांनी प्रस्तुत अर्जास त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे व अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. वादी यांचे असे कथन आहे की, पुरावा गोळा करणेकरिता न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करता येत नाही.

६. अर्ज, म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द मनाई हुकुम मिळणेकरिता केलेला आहे. प्रस्तुतच्या दाव्याची संपरिक्षा अद्याप चालू झालेली नाही. दाव्यात मुद्दे निश्चीत केलेले नाहीत. वादीने प्रस्तुतचा दावा मनाई हुकुमाकरिता केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी हरकत अडथळा करतात. प्रतिवादीने ते नाकारले आहे. वादी प्रस्तुतच्या दाव्यात मनाई हुकुम मागत असल्यामुळे दावा मिळकतीत त्यांची कब्जे वहिवाट आहे व त्यास प्रतिवादी हरकत अडथळा करतात याबाबी पुराव्यानिशी सिध्द करण्याची जबाबदारी वादीची आहे. प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणात प्रतिदावा केलेला नाही. त्यांची कोणतीही मागणी नाही. अश्या परिस्थितीत प्रतिवादींवर कोणतेही तथ्ये पुराव्यानिशी शाबीत करण्याची जबाबदारी नाही. त्यामुळे प्रतिवादींना न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक होणेबाबत मागणी करणेस कोणतेही संयुकतीक कारण नाही. त्यापुढे प्रकरणात अद्याप पुरावा सुरु झालेला नाही. न्यायालयीन आयुक्तांशिवाय इतर कोणत्याही पुराव्याने प्रतिवादी म्हणतात ती तथ्ये पटलावर येणार नाहीत असे या प्राथमीक स्थितीला म्हणता येणार नाही. सबब वरील सर्व तथ्ये, परिस्थिती व कथनांचा विचार करता अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

ATUL ASHOK KORE

Digitally signed by ATUL ASHOK KORE
Date: 2023.07.11 13:57:31 +0530

अतुल अ.कोरे,

दिनांक १०.०७.२०२३. सह.दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पन्हाळा.